# विभागीय क्रीडा स्पर्धा देगलूर महाविद्यालयात संपन्न

देगलूर (म.नेता)



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि देगलूर महाविद्यालय देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय अंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन स्पर्धा(मुले/मुली )आयोजित करण्यात आलेले होते.देगलूर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत मुले प्रथम क्रमांक बहिर्जी स्मारक महाविद्यालय वसमत द्वितीय क्रमांक देगलूर महाविद्यालय देगलूर तृतीय क्रमांक महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर तर

मुली मध्ये प्रथम क्रमांक महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा द्वितीय क्रमांक देगलूर महाविद्यालय देगलूर तृतीय क्रमांक वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर संघानी विजय प्राप्त केला .या स्पर्धेचे अतिशय योग्य नियोजन प्रा.डॉ निरज उपलंचवार,प्रा.डॉ दिलीप भडके,प्रा.दिपक वावधाने. प्रा सिताराम हके यांनी केले होते.स्पर्धेचे उद्घाटन अ.व्या. शि.संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रकाश पाटील बेंब्रेकर यांच्या हस्ते झाले. स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मोहन खताळ यांनी खेळाडूसाठी सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या.यावेळी उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार ,क.म.वि उपप्राचार्य उत्तमकुमार कांबळे,पर्यवेक्षक प्रा.संग्राम पाटील यांची उपस्थिती होती. स्पर्धेत पंच म्हणून प्रा.मुबीन अब्दुल, प्रा फैयाज,प्रा.शेख नूर,प्रा.विजय कुदळे, श्री मधुकर कांबळे आणि श्री संतोष घाडे यांनी काम पाहिले.

तर यावेळी संयोजक डॉ निरज उपलंचवार, प्रा दीपक वावधाने, प्रा डॉ संतोष येरावार,डॉ भानुदास नरवाडे, डॉ संजय देबडे,प्रा शिवचरण गुरुडे,प्रा बाळासाहेब नागरगोजे,प्रा तुकाराम लागले,प्रा लक्ष्मीकांत मल्लूरवार,आणि क्रिडाशिक्षक प्रा सीताराम हके यांनी परिश्रम घेतले तसेच सूत्र संचालन प्रा.शिवचरण गुरूडे व आभार डॉ निरज उपलंचवार यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner